# दसऱ्याला सावंगा विठोबा येथे भव्य यात्रा

## श्री कृष्णाजी अवधुत महाराज देवस्थानातील ७२ फुट उंच झेंड्यांना चढविला नविन खोळ : श्री कृष्णाजी अवधुत महाराज यांच्या मंदिरात चंदनउटीचा कार्यक्रम

चांदूर रेल्वे (उत्तमराव गावंडे) : संपूर्ण महाराष्ट्रातील सुप्रसिध्द आणि विदर्भातील पंढरपूर म्हणून सर्वदूर परिचीत असलेले अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगा विठोबा येथील श्री कृष्णाजी अवधुत बुवा देवस्थानात दसऱ्याच्या दिवशी १८ ऑक्टोबरला श्री कृष्णाजी उर्फ अवधुत बुवा यांची समाधी व झेंड्यांना चंदनउटीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. असंख्य भाविक भक्तांच्या उपस्थितीत देवस्थानातील ७२ फुट उंच देव व भक्तांचा झेंड्यांना नवीन खोळ चढविण्याचा भव्य दिव्य कार्यक्रमसुध्दा संपन्न झाला.



तिनशे वर्षापूर्वी कृष्णाजी महाराज उर्फ अवधुत बुवा यांनी चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगा विठोबा येथे समानेतेची शिकवण देणारे अवधुती संप्रदायाची स्थापना केली. देव व भक्ताना समान दर्जा दिला. त्याचे प्रतिक म्हणून आजही मंदिरात ७२ फुट उंच दोन झेंडे आहेत. कृष्णाजी महाराज यांचे अवधुती भजन लिखीत नसले तरी परंपरने भक्तांच्या मुखपाठ असून समाज प्रबोधन करणारे आहेत. प्रत्येक अमावश्येला देवस्थानात चंदनउटीचा कार्यक्रम घेण्यात येतो. गुरूवारी १८ ऑक्टोबरला दसऱ्याच्या दिवशी अवधुत महाराज यांची समाधी व झेंड्यांना चंदनउटीचा कार्यक्रम विधीवत व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कृष्णाजी महाराज यांची समाधी, ईश्वर पुनाजी व भक्तांची समाधी, देव व भक्ताचे समानतेचे झेंडे, लहान मंदिर व मोठे मंदिरात स्नान घालून चंदन उटीने पुजा केली. यावेळी अवधुत बुवांच्या समाधीवर नवीन चादर चढविण्यात आली. यासोबतच अवधूती भजनाची मांड सुरू होती. दुपारी ४ वाजता समानतेचे प्रतिक ७२ फुट उंच दोन उंच झेंड्यांना नवीन खोळ चढविण्याच्या कार्यक्रमाला झाली होती. अवधुत भक्त चरणदास कांडलकर यांनी पदस्पर्श न करता दोन्ही झेंड्यांवर नवीन खोळ चढविली. शेकडो भक्तांनी हा अविस्मरणीय क्षण आपल्या हृदयात साठवून ठेवला. सदर कार्यक्रमासाठी हजारो भक्तांची गर्दी उसळली होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विठोबा देवस्थान अध्यक्ष गोविंदराव राठोड, उपाध्यक्ष हरिदास सोनवाल, सचिव वामनराव रामटेके, विश्वस्त यांच्यासह गावकऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# जलयुक्त शिवार च्या धरतीवर टाकरखेड्यात चारायुक्त शिवार

टाकरखेडा संभु (संतोष शेंडे) : जिल्ह्यात राबविल्या गेलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या धरतीवर टाकरखेडा संभु येथे चारायुक्त शिवार हा प्रयोग राबविल्या जात आहे. पशुंना मोठ्या प्रमाणात व पोषणयुक्त चारा निर्माण व्हावा या उद्देशाने थोंबाची लागवड करुन येथील पशुवैद्यकिय दवाखाण्याच्या वतीने हा उपक्रम शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राबवावा असे आवाहन पशुवैद्यकिय अधिकारी डॉ.विलास झोडपे यांनी केले आहे.

सध्या सततच्या नापिकीमुळे शेतकरी हैराण झाले आहे. त्यात पशुंना चारा कुठुन मिळणार अशी स्थिती असतांना टाकरखेडा संभु येथे पशुवैद्यकिय दवाखान्याच्या वतीने चारायुक्त शिवार हा उपक्रम राबविण्यात आला आहे. याचे प्रात्यक्षिक म्हणुन येथील पशुवैद्यकिय दवाखान्याच्या प्रांगणात थोंबाची लागवड करुन या पासुन निर्माण होणारा चारा शेतकऱ्यांना निःशुल्क वाटल्या जात आहे.हा चारा अत्यंत पोषक आणी कमी खर्चाचा असुन यामुळे गाईच्या दुधात वाढ होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी देखिल शेताच्या धुऱ्यावर थोंबाची लागवड करावी असे आवाहन यावेळी शेतकऱ्यांना करण्यात आले. या कार्यक्रमाला पशुधन डॉ. विलास झोडपे अधिकारी राजेंद्र देशमुख, सरपंच चंद्रशेखर गेडाम,उपसंरपच प्रिती पाटील, पौर्णिमाताई सवाई,अविनाश पाटील, माजी सरपंच दिपक पाटील, प्रदिप मेश्राम,रामदास लांडगे,प्रमोद शेकार,बबन टेकाडे, डॉ. हरणे, डॉ. इमरान, विजय सवाई आदिंसह पशुपालक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ कबड्डी (पुरुष) स्पर्धेकरिता चमूची निवड

अमरावती दि. २० : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. २६ ते ३० नोव्हेंबर, २०१८ दरम्यान होणाया पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पुरुष चमूची निवड करण्यात आली आहे. सदर चमूचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती येथे संपन्न होणार आहे. सदर चमूची माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेत स्थळावर 'बोर्ड ऑफ स्पोर्टस् अॅण्ड फिजिकल एज्युकेशन' या मुख्य शिर्षातील 'इंटर युनिव्हर्सिटी टुर्नामेन्ट' या उपशिर्षामध्ये 'इंटर युनिव्हर्सिटी कबड्डी (मेन) टीम' या सदराखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी इंदिरा महाविद्यालय, कळंबचा यशवंत गजानन मोकलकर, जय किशोर मानकर व जगदिश वामन कारनोके, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शिटाकळीचा देविदास संजय जगताप, अजिंक्य अन्नासाहेब जिवरक, आकाश संजय सातरोटे व शुभव रमेश मोटे, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोडचा शेख अब्दुल गुलाम, संत गाडगे महाराज महाविद्यालय, वलगांवचा श्रेयस प्रमोद निकम, युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा श्रेयस गजानन ठाकरे, महात्मा फुले महाविद्यालय, पातुरचा विकास सुभाष वानखडे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा मंगेश मधुकर कुसराम याची, तर राखीवमध्ये डी.सी.पी.ई., अमरावतीचा कुणाल गजेंद्र जिचकार, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळचा यश दिनेश जयस्वाल, जी.एस. महाविद्यालय, खामगांवचा रणजीत अरुण भोसले, बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडाचा आदेश मनोहर वरखडे व वाय.डी.व्ही.डी. महाविद्यालय, तिवसाचा आदर्श अरविंद लांडगे याची निवड करण्यात आली आहे.

# विश्व हिंदू महासंघाने केले रावणाचे दहन

## रावणासह मेघनाथ-कुंभकर्णाच्या पुतळ्याचे दहन : भव्य आतिषबाजी करुन उत्सव साजरा

अमरावती दि.१९: विश्व हिंदू महासंघाच्या स्थानिक शाखेच्या वतीने विजयादशमीच्या पावन पर्वावर स्थानिक नेहरु मैदानात १८ ऑक्टोबर रोजी रावण दहनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात स्थानिक गणमान्य नागरिकांसह शहरातील हजारो नागरिकांनी आपली उपस्थिती दर्शविली. जल्लोषपूर्ण वातावरणात फटाक्यांच्या आतिषबाजीत दशमूखी रावणाचे दहन करण्यात आले.



त्यानंतर कुंभकर्ण व मेघनाथाचा पुतळाही जाळण्यात आला. यावेळी जय श्रीरामच्या घोषणांनी आसमंत दुमदुमला होता. रावण दहन कार्यक्रमाला आमदार डॉ.सुनील देशमुख, आ. श्रीकांत देशपांडे, माजी खासदार अनंत गुढे, जगदीश गुप्ता, विश्व हिंदू महासंघाचे प्रदेश महामंत्री हेमेंद्र जोशी, जिल्हाध्यक्ष आशिष राठी, जिल्हा महामंत्री राजू राजदेव, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष नितीन धांडे, महिला सेलच्या अध्यक्ष सरिता सोनी, भाजपच्या उत्तर प्रदेश संघटन मंत्री अरुणा यादव, विश्व हिंदू महासंघाचे उत्तरप्रदेश उपाध्यक्ष रविशंकर अंगडीया, प्रमोद मुरारका, योगेश श्रावगी, प्रणित सोनी, संतोषकुमार नवलानी, संजय पमनानी, नंदलाल खत्री यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे यांचे हस्ते मेघनाथच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. फटाक्यांच्या आतिषबाजीने परिसर दणाणला होता.

## विद्यापीठाचा पस्तीसावा दीक्षांत समारंभ २० डिसेंबरला

अमरावती दि. २० : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पस्तीसावा दीक्षांत समारंभ गुरुवार, दि. २० डिसेंबर, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ परिसरात आयोजित करण्यात येत आहे. आजवर विद्यापीठाने चौतीस दीक्षांत समारंभ अतिशय उत्कृष्टपणे, शिस्तबद्ध व सुचारु पद्धतीने पार पाडले आहेत. त्याकरीता सर्वांचे सहकार्य लाभले. तरी दि. २० डिसेंबर, २०१८ रोजी संपन्न होत असलेल्या पस्तीसाव्या दीक्षांत समारंभाची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी कळविले आहे.






## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत इ गृहप्रवेश

अमरावती दि.१९(प्रतिनिधी) अंजनगावबारी येथील लाभार्थी फातेमाबी अब्दुल सलीम यांना सन २०१६-१७ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरात व गृहप्रवेश १९ ऑक्टोबर रोजी पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हीडीओ कॉन्फरन्स व्दारे लाभार्थी महिलेसोबत संवाद साधला. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या सीईओ मनिषा खत्री, प्रकल्प संचालक भंडारी, बोंगे, गटविकास अधिकारी व इतर लाभार्थी, ग्रामस्थ,सरपंच, पंचायत समिती सदस्य, उपसरपंच,ग्रामविकास अधिकारी यांची उपस्थिती होती.अंजनगावबारी येथे २०१६-१७ मध्ये ११८ घरकुल, २०१७-१८ मध्ये ५ घरकुल, २०१८-१९ मध्ये ६६ घरकुल मंजुर होते. त्यापैकी १११ घरकुल पूर्ण झाले असून उर्वरीत घरकुलाचे काम सुरु झाले आहे.

### ॲनिमेशन महाविद्यालयाचा प्रथम सलग्नीकरण मान्यता सोहळा २१ ला

अमरावती दि.१९(प्रतिनिधी) येथे साद शिक्षण संस्थेतर्फे सुरु असलेल्या ॲनिमेशन बायोइंजीनियरींग अॅन्ड रिसर्च सेंटरला शासनाने प्रथम सलग्नीकरण मान्यता सोहळा २१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे, आ.यशोमती ठाकूर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरु राजेश जयपुरकर यांची उपस्थिती राहणारआहे. आजवर शेकडो विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाव्दारे देश व जागतिक पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे. या सर्व कार्याची दखल व काळाजी गरज ओळखून यंदापासून राज्य शासन व अमरावती विद्यापीठाने पुढाकार घेवून या ॲनिमेशन महाविद्यालयाला प्रथम संलग्नीकरणाची मान्यता दिली आहे.





## पलाश लाईन येथून १ लाख ३४ हजाराचा ऐवज लंपास

अमरावती दि.१९(प्रतिनिधी) शहरात चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असतांनाच गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पलाश लाईन भागात अज्ञात चोरट्यांने घरफोडी करुन आलमारीतून सुमारे १ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना नुकतीच घडली.

पोलिस सूत्रानुसार, पलाश लाईन भागातील रहिवासी राखी रविंद्र चौधरी ह्या महालक्ष्मीचे जेवन करण्यासाठी बाहेर गेल्या होत्या. त्यांनी तुळशीसमोरील रॅकमध्ये घराची चाबी ठेवली होती. अज्ञात चोरट्याने घरी कुणीही नसल्याची संधी साधून त्यांच्या घरात घरफोडी केली. यात ५ ग्रॅमचे सोन्याचे कानातले किंमत १० हजार रुपये, ७ ग्रॅमची सोन्याची पोत किंमत १४ हजार रुपये, बिशीसाठी गोळा केलेले १ लाख १० हजार रुपये असा एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. तक्रारीवरुन गाडगेनगर पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## बडनेरात १५ जुगाऱ्यांवर फौजदारी कारवाई

अमरावती दि.१९(प्रतिनिधी) बडनेरा येथील नवीवस्ती भागातील आठवडी बाजारात चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर बडनेरा पोलिसांनी धाड घालून १५ जुगाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली.

पोलिस सूत्रानुसार, कारवाई करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहम्मद सलीम अब्दुल अजीज, दामोधर हरीराम खिलनानी, अफरोज खान मन्नान खान, ओंकारसिंग बावरी, मो. शोएब मो. जाकीर, विकास मुरलीधर दुधे, सैय्यद इमरान सैय्यद रऊफ, गजानन गंगाराम शेबे, शाकीर मोहम्मद नुर मो., इमरान खान ईस्माईल खान, वहीद कुरेशी अब्दुल रहेमान, शेख बबलू शेख बशीर, शेखर शिवराज सोनकांबळे, विनोद तुळशीराम जाधव, प्रल्हाद शंकरराव निंघोट यांचा समावेश आहे. पोलिसांनी सर्व आरोपींकडून जुगार साहित्य व रोकड जप्त केली असून त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली आहे.


महाराष्ट्र शासन

**कार्यालय–सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,अमरावती.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चांदुर रेल्वे रोड,अमरावती.

**सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षामध्ये अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी जाहीर आवाहन**

सन २०१८–१९ पासून महाराष्ट्र शासनातर्फे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एकत्रित संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. महाडीबीटी हे या संकेतस्थळाचे नांव असून https://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ संचालक माहिती व तंत्रज्ञान (DIT) यांचेमार्फत नव्याने कार्यान्वित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्ती/शिक्षण फी परीक्षा फी/विद्यावेतने/निर्वाह भत्ता वितरित करावयाच्या खालील योजनांचा समावेश या संकेतस्थळामध्ये करण्यात आला आहे.

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती २. राज्य शासनाची मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परीक्षा फी प्रतिपुर्ती योजना ३. राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती (इ.११ वी १२ वी) ४. व्यवसायिक अभ्यासक्रम मधुन शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

सदर डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यावर त्यांना देय होणारे शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, शिक्षण फी, इतर अनुज्ञेय फी, त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट वितरित केला जाणार आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड क्र. आपल्या बँक खात्याशी संलग्नीत करुन घ्यावेत.

महाडीबीटीची वैशिष्ट्ये :–

१.लाभार्थी कोणत्याही वेळी कुठुनही महाडीबीटीच्या वेबसाईटवर नोंदणी करु शकतात.
२.लाभार्थी त्यांच्या स्वत:च्या अर्जाची स्थिती युझर आयडीने पाहू शकतात.
३.सुलभ पडताळणी आणि पारदर्शकता यासाठी मार्कशीटस्, जात प्रमाणपत्र इ. अपलोड करु शकतात.
४.महाडीबीटी प्रक्रियाच्या विविध स्तरांवर विद्यार्थी आणि संस्थांना एसएमएस आणि ई–मेल अलर्टची तरतूद.
५.विद्यार्थ्यांच्या बँकेच्या खात्यात शिष्यवृत्तीची प्रत्यक्ष वितरण.
६.सुलभ शिष्यवृत्ती मंजुरीची प्रक्रिया.
७.भुमिका आधारित युनिक लॉग इन आयडी आणि पासवर्ड सर्वांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
८.विभाग आणि राज्य प्राधिकरण यांच्याद्वारे शिष्यवृत्तीच्या देखरेखीची पारदर्शकता.
९.कोणत्याही स्वरुपाच्या तांत्रिक बाबींची अडचण उदभवल्यास संकेत स्थळावरील टोल फ्री क्रमांकावर साधण्यास कळविले आहे.
(टोल फ्री क्रमांक ०२२–४९१५०८००)
१०.पात्रतेचे निकष विभागाचे संकेतस्थळ https://sjsa.maharashtra.gov.in वर देखील उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

१.वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज MAHADBT PORTAL संकेतस्थळ https://mahadbtmahait.gov. in वर देण्यात आलेल्या युजर मॅन्युअल/एफए.क्यु. चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टलवर दिलेल्या सुचनांचे पालन करुन अर्ज भरण्याचा विहित तारखेपर्यंत न थांबता संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावा.
२. अर्जदार शिष्यवृत्तीसाठी निर्धारित केलेल्या सर्व अटी लागू करण्यासाठी आणि पुर्ण करण्यासाठी पात्र आहे याची खात्री करण्याची संपुर्ण जबाबदारी अर्जदाराची असेल.
३.जर अर्जदाराची पात्रता कोणत्याही टप्प्यावर अवैध आढळली तर त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.
४.अर्जदाराची अंतिमत अर्ज जमा करण्यापुर्वी तपासावे की त्याच्या/तिच्या द्वारे प्रदान केलेले सर्व तपशिल योग्य आहेत कारण त्यानंतर माहिती संपादित करण्यासाठी कोणतीही तरतूद प्रणालीमध्ये नसेल.
५. शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्याची पध्दत केवळ ऑनलाईनच असेल.
६. ''*'' चिन्हासह जे रकाने चिन्हांकित आहेत ते भरणे अनिवार्य असेल.
७. ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्र. मोबाईल क्रमांकाशी संलग्नीत नाहीत त्यांनी त्वरित जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी संलग्न करुन घ्यावेत.

सर्व संस्थांच्या/ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सुचनाफलकावर कायमस्वरुपी लावावी व पात्र विद्यार्थ्यांना वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी सहकार्य करावे व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेले अर्जाची पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने छाननी करावी.

विद्यार्थ्यांचा आधार संलग्न बँक खात्यावर ही लाभाची रक्कम जमा केल्याबाबतची सूचना डीबीटी पोर्टलद्वारे प्रत्येक महाविद्यालयाला दिली जाईल. त्यामुळे संबंधित विद्यापीठ/शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/ तंत्रनिकेतने यांनी कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेवू नये. तसेच कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही याची योग्य ती दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत शैक्षणिक संस्थांची असेल. सर्व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी दि.१५/११/२०१८ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरावेत. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरुन घ्यावयाची जबाबदारी संबंधीत शैक्षणिक संस्थांची असेल.

(मंगला मुन)
सहाय्यक आयुक्त,
समाजकल्याण,अमरावती.

विमाका/अम./जाही./९२५/२०१८–२०१९